# प्रा. संदीप पाटील यांना पीएच.डी.



**गांधीनगर :** वसगडे, ता. करवीर येथील प्रा. संदीप पाटील यांना शिवाजी विद्यापीठातर्फे अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. ते विवेकानंद कॉलेज येथील अर्थशास्त्र विभागात कार्यरत असून, त्यांनी प्रा. डॉ. जे. एस. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. त्यांना शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद

सोमवार, १९ मे २०२५

# या नवरा-बायकोच्या डोक्यात

# फक्त दगड-धोंडे!

**जागतिक संग्रहालय दिन विशेष**

- संग्रह दगड-धोंड्यांचा माहितीचा
- भूगर्भाचे अंतरंग केले उघड

**कोणी दागिन्याचा संग्रह करतो, कोणी वेगवेगळ्या वस्तूंचा संग्रह करतो, कोणी नाण्यांचा, नोटांचा करतो, पण कोल्हापुरातील नवरा-बायकोच्या एका जोडीचा संग्रह खूप म्हणजे खूप वेगळा आहे आणि हा संग्रह चक्क आपल्या अवतीभवती असलेल्या दगड-धोंड्यांचा आहे. दगड-धोंडे म्हणजे त्याला एवढं काय मूल्य? असा विचार साहजिकच आपल्या प्रत्येकाच्या मनाला चाटून जातो. पण या नवरा बायकोच्या दृष्टीने दगड-धोंड्याचा हा संग्रह केवळ अमूल्य आणि अमूल्य असाच आहे.**



**सुधाकर काशीद**
कोल्हापूर

हा संग्रह कोल्हापूर परिसरातील साऱ्या भूगर्भाचा वेध घेणारा आहे हा वेध म्हणजे एक-दोन नव्हे, शेकडो नव्हे, हजारो नव्हे, पण कोटी वर्षांपूर्वीचा आहे. कोल्हापूरच्या भूगर्भात काय, काय दडून राहिले आहे, याचा हा अस्सल पुरावा या नवरा-बायकोनी संग्रहित केला आहे. एखाद्याचे काहीतरी चुकले तर सहजच म्हणतो, की तुझ्या डोक्यात काय द्रगड भरले आहेत काय? म्हणजेच बुद्धीचा आणि तुझ्या डोक्याचा काय संबंध आहे, असेच अनेकवेळा सहजपणे म्हणून जातो. दगड-धोंडे म्हणजे त्याला काही किंमत नाही, असेच आपण त्यातून व्यक्त होत असतो. पण या नवरा-बायकोच्या डोक्यात खरोखरच फक्त दगड-धोंडे भरले आहेत आणि त्यांचा संग्रह म्हणजे दगड-धोंड्यांचे पर्यावरणाशी असलेले नाते स्पष्ट करणारे आहे आणि त्यामुळेच, 'होय, आमच्या डोक्यात दगड-धोंडेच भरले आहेत,' असा या जोडीचा अभिमानपूर्वक दावाही आहे.



प्रा. अभिजीत पाटील



प्रा. योगिता पाटील

प्रा. अभिजीत पाटील, प्रा. योगिता पाटील अशी ही दगड-धोंड्यांचा संग्रह करणारी जोडी. अभिजीत हे विवेकानंद महाविद्यालयात आणि योगिता या गोखले कॉलेजमध्ये जीओलॉजीच्या प्राध्यापक आहेत. दगड, धोंडे, माती, डोंगर, टेकड्या'चे अंतरंग हे त्यांच्या अभ्यासाचे विषय. दगड किंवा भूगर्भातील दगडाचे थर याचा जिल्ह्याच्या अनुषंगाने त्यांनी अभ्यास केला आहे. त्यांच्या मते जिल्ह्यातील आजरा परिसरातील भूगर्भातील दगड खूप जुना आहे. उर्वरित जिल्ह्यात बेसॉल्टचा थर आहे.

चंदगड, आजरा, शाहूवाडी, दुर्गमानवाड परिसरात लेटराईटचा दगड आहे, त्यात बॉक्साईट आहे. दगडाचे थर कसे तयार होतात, याचे स्वरूप जिल्ह्यात अगदी सहज दिसून येते. अशा डोंगर कपाऱ्या आहेत. जोतिबा डोंगरावर ६ ते ७ थर दिसतात. पन्हाळ्यावर जकात नाक्यासमोर ८ ते ९ थर दिसतात. गिरगावला १० ते ११ थर दिसतात. पश्चिमेकडील घाट मार्गात हे थर कड्याच्या बाजूला सहज दिसतात. या थरात लाल मातीचा बारीक थर दिसतो. ती लाल माती म्हणजे काव हा रंगकामात उपयोगी घटक आहे. स्तंभरचनेचे दगडी स्तंभ, जोतिबा, पन्हाळा तुमजाई डोंगर, बांदिवडे, मसाई पठार येथे सहज अभ्यासता येतात. दगड-धोंड्याचे हे अंतरंग खूप वेगळे आहेत. त्यात खूप वेगवेगळी खनिजे आहेत. खडक रूपांतराच्या रचना आहेत, जिओलॉजीच्या अभ्यासात त्याचा समावेश आहे.

कोट्यावधी वर्षापासून घडलेला इतिहास त्यात दडला आहे. दूधगंगा, राधानगरी परिसरात वाळूकामय दगड आढळतो. अर्थात भूगर्भातले सर्व संशोधन अद्याप पूर्ण झालेले नाही. ते जेव्हा होईल तेव्हा भूगर्भाचे अंतरंग अधिकच वेगवेगळ्या वैशिष्ट्यांनी उघड होतील. पण या अभ्यासाच्या निमित्ताने अभिजीत पाटील, योगिता पाटील यांनी दगड-धोंड्यांचा संग्रह केला आहे आणि काही काळानंतर यात भरच पडत जाणार आहे. वर वर साधा दिसणारा दगड किती प्राचीन, किती मोलाचा आहे, याची माहिती म्हणजे परिसरातील भूगर्भाचे अंतरंग खुले करणारी आहे. त्यामुळे ही जोडी दगड-धोंड्यांच्या सहवासात आहे. सारे गाव त्यांना म्हणते, यांच्या डोक्यात दगड-धोंडेच भरलेले आहेत. आणि होय, आमच्या डोक्यात दगड-धोंडेच भरले आहेत, असं म्हणताना या जोडीला विशेष अभिमान आहे.